


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०४ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । ३०/०४/२०२६ । पाने - ६




## तळपत्या उन्हात रस्त्याचे डांबरीकरण

### वाहतूक विस्कळीत आणि कामगारांचे हाल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने शहरातील अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाचे व कॉंक्रिटीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मात्र या कामांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असले, तरी कामांच्या वेळापत्रकाबाबत आणि नियोजनाबाबत मात्र नाराजीचा सूर उमटत आहे. दुपारच्या तीव्र उष्णतेत सुरू असलेल्या डांबरीकरणामुळे रस्त्यावर वाहतूक ठप्प होत आहे आणि कामगारांना देखील मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने ही कामे रात्रीच्या वेळेत करण्यात यावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

सध्या शहरातील प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांवर डांबरीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. सकाळपासूनच कामाला सुरुवात होत असली तरी दुपारच्या सुमारास तापमान मोठ्या प्रमाणात वाढते. या उष्णतेमुळे रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांना आरोग्याच्या समस्या जाणवू लागतात. उष्माघात, थकवा, डोकेदुखी यांसारख्या त्रासांमुळे कामगारांची कार्यक्षमता देखील कमी होत असल्याचेही दिसून येते.

दुसरीकडे या महत्त्वाच्या रस्त्यावर वाहतूक मोठ्या प्रमाणात असते. अशा वेळी रस्ते अर्धवट बंद करून (पान ६ वर)

# उन्हाचा तडाखा आणि विजेचा लपंडाव

## नागरिक हैराण, व्यावसायिकांचे मोठे नुकसान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ऐन तीव्र उन्हाळ्यात शहरात वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक आधीच त्रस्त असताना वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्रीही वीजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून वीज पुरवठा अत्यंत अनियमित झाला असून, अचानक खंडित होणाऱ्या वीजेमुळे घरगुती कामकाजासोबतच दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांना आरामाची गरज असताना विजेअभावी पंखे, कुलर, एसी बंद पडत असल्याने उकाड्याने हैराण होण्याची वेळ आली आहे. रात्रीच्या वेळीही वीज खंडित होत असल्याने झोपमोड होत असून, डासांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांचे हाल अधिक वाढले आहेत.

दरम्यान, वीज दरवाढ आणि विविध अतिरिक्त करांमुळे नागरिक आधीच आर्थिक तणावाखाली आहेत. एकीकडे सौर ऊर्जेमुळे वीज मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचे




सांगितले जात असताना, प्रत्यक्षात मात्र पुरवठा सुरळीत का होत नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

वीज पुरवठ्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केल्यास समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. काही ठिकाणी अधिकाऱ्यांकडून उर्मट वर्तन केल्याचेही आरोप करण्यात येत आहेत. दोन दिवस बिल न भरल्यास तात्काळ वीज खंडित केली जाते, मग वारंवार खंडित होणाऱ्या वीजेचा जाब कोण देणार? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. सदर परिस्थिती लक्षात घेता वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नियमित व सुरळीत वीज पुरवठा करावा, तसेच नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित दखल घेऊन योग्य प्रतिसाद द्यावा, अशी मागणी नागरिक व व्यापारी वर्गाकडून होत आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीज पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

### व्यावसायिकांना फटका

**संगमनेर हे महत्त्वाचे बाजारपेठेचे केंद्र असल्याने येथे लहान-मोठ्या व्यवसायांची मोठी उलाढाल होते. मात्र सततच्या वीज खंडिततेमुळे दुकाने, उद्योग आणि सेवा क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर आधारित व्यवसाय, हॉटेल्स, वर्कशॉप्स आणि लघुउद्योगांना थेट फटका बसत असून, आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.**

# आ. सत्यजित तांबे यांच्या जनता दरबारात समस्यांचा तातडीने निपटारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सततच्या विकास कामे, सहकार, शिक्षण, ग्रामीण विकास, दुग्ध व्यवसाय, शेती यामधून संगमनेर तालुका समृद्ध केला शांतता व सुव्यवस्था अशी ओळख असलेल्या संगमनेर तालुक्यात मागील दीड वर्षापासून नागरिकांमध्ये मोठी अस्वस्थता पसरली आहे. जनतेचे प्रत्येक प्रश्न सोडवण्यासाठी माजीमंत्री बाळासाहेब थोरात हेच पर्याय असून आमदार सत्यजित तांबे यांनी घेतलेल्या जनता दरबारात संगमनेर मधील नागरिकांचा मोठा उदंड प्रतिसाद लाभत आहे.

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे आमदार सत्यजित तांबे यांनी नागरिकांचे विविध प्रश्न सोडवणुकीसाठी जनता दरबार घेतला. यावेळी संगमनेर शहर व तालुक्यातील नागरिक,युवक, महिला व कार्यकर्ते यांची मोठी लक्षणीय उपस्थिती होती.



### यशोधन हे जनतेच्या मदतीचे केंद्र

**यशोधन कार्यालयामध्ये तालुक्यातील व तालुका बाहेरून आलेल्या सर्व नागरिकांचे प्रश्न समजावून घेऊन प्रत्येक प्रश्न सोडवण्यासाठी शेवटपर्यंत पाठपुरावा केला जातो. हे जनसंपर्क कार्यालय जनतेच्या मदतीचे केंद्र ठरले असल्याचे प्रतिपादन कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांनी केले आहे.**

माजीमंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका व शहरांमध्ये अनेक मोठ मोठी विकास कामे मार्गी लागली आहेत. याचबरोबर शांतता सुव्यवस्था आणि बंधू भावाचे वातावरण हे संगमनेर शहराचे वैशिष्ट्य राहिले. यामुळे बाजारपेठ फुलली. शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या प्रामाणिक संस्कृतीमुळे राज्यभरामध्ये सज्जन तालुका म्हणून संगमनेरची ओळख निर्माण झाली. मात्र मागील दीड वर्षापासून संगमनेर शहर व तालुक्यामधील नागरिकांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका हा आपला परिवार मानला. तालुक्यात पठारभाग, प्रवरा पट्टा आणि तळेगाव पट्टा असे तीन भौगोलिक विभाग असून १७१ गावे आणि २५८ वाड्या वस्त्या आहेत. निळवंडे धरण डावा व उजवा कालवा, थेट पाईपलाईन योजना हायटेक बसस्थानकासह शहरांमध्ये विविध वैभवशाली इमारती, नाशिक - पुणे महामार्गाची चौपदरीकरण शहरांमध्ये येणाऱ्या चारही बाजूच्या रस्त्यांचे चौपदरीकरण यांसह प्रत्येक गावात विकासाच्या योजना राबवण्यात बरोबरच त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने प्राधान्य दिले. प्रत्येक नागरिकाला आपले प्रश्न सोडवण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात हेच जिव्हाळ्याचे वाटत आहे.

(पान २ वर)

# आमदारकीसाठी पक्ष कुणाच्या दावणीला बांधणार नाही - कडू

मुंबई (वृत्तसंस्था)


प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी आपल्या संघटनेची शिवसेनेसोबत होणाऱ्या संभाव्य विलिनीकरणाची चर्चा फेटाळली आहे. आम्ही खूप संघर्षातून संघटना उभी केली आहे. त्यामुळे विलिनीकरणाच्या बातम्या पाहून दु:ख वाटले. मी जुना शिवसैनिकच आहे. शिवसेनेशी बंडखोरी करून आम्ही प्रहार संघटना उभी केली. शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर दुसऱ्या पक्षात न जाता स्वत:च्या जिवावर संघर्ष करणारा मी राज्यातील एकमेव कार्यकर्ता आहे. आम्हाला कोणत्याही पक्षाचा पाठिंबा नाही. पाठिंबा देतो म्हटले तरी आम्ही घेत नाही. एवढे आम्ही तटस्थ आहोत, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी कागदपत्रे माझ्या बॅगेतच आहेत, असे सांगत विधान परिषदेवर जाण्याची आपली तयारी असल्याचेही स्पष्ट केले.



माजी मंत्री बच्चू कडू यांचा प्रहार पक्ष शिवसेनेत विलीन होणार असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेषत: शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची ऑफर देण्यात आल्याचाही दावा केला जात आहे. बच्चू कडू यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणी विस्तृत भाष्य केले. ते म्हणाले, माध्यमांनी सूत्रांचा दाखला देत मी शिवसेनेच्या मदतीने विधानपरिषदेवर जाणार असल्याची बातमी दिली. उद्या विधानपरिषद भेटली, तर ती मीडियाची कृपा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे मी तुमचे आभार मानतो. दुसरे आभार मानतो मी एकनाथ शिंदेंचे.

एकनाथ शिंदे यांनी सत्तांतर केले तेव्हा मी एक राजकीय भूमिका घेतली होती. त्यामुळे माझी बदनामीही खूप झाली होती. त्या राजकीय भूमिकेमुळे मला दिव्यांग मंत्रालय मला भेटले. कदाचित मला मंत्रिपद भेटले असते. पण मी ते टाळले. मी पुन्हा कामाला लागलो. नंतर शेतकरी कर्जमाफीचे आंदोलन झाले. आमची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली होती. त्यात एकनाथ शिंदेंची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली. त्यांच्या भूमिकेमुळेच आज कर्जमाफीची घोषणा झाली. या घोषणेमुळेच आमच्या आंदोलनाला यश मिळाले. शब्दाचा पक्का म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, असे कडू यावेळी शिंदेंचे कौतुक करताना म्हणाले.






# गुटखा-तंबाखू पॅकिंग होणार पर्यावरणपूरक



मुंबई (वृत्तसंस्था)

आता लवकरच तुम्हाला गुटखा, तंबाखू आणि पान मसाल्याचे प्लास्टिक पाऊच दिसणार नाहीत. फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अथॉरिटी ऑफ इंडिया ने सांगितले की, पान मसाल्याच्या पॅकिंगमध्ये वापरले जाणारे प्लास्टिक मटेरियल आता कागद, पेपरबोर्ड, सेल्युलोज आणि इतर पर्यावरणपूरक मटेरियलने बदलले जाईल. यासाठी एफएसएसएआय ने मंगळवारी 'अन्न सुरक्षा आणि मानक (पॅकेजिंग) नियमन २०१८' मध्ये सुधारणा करण्यासाठी एक मसुदा अधिसूचना जारी केली आहे. या मसुदा 'प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०२६' वर पुढील ३० दिवसांपर्यंत भागधारकांकडून मते आणि आक्षेप मागवण्यात आले आहेत. त्यानंतर या नियमाला अंतिम स्वरूप दिले जाईल.

नवीन प्रस्तावानुसार, गुटखा, पान मसाला आणि तंबाखूच्या कोणत्याही पॅकेजमध्ये कोणत्याही स्वरूपात प्लास्टिक मटेरियलचा वापर करता येणार नाही. यात 'विनाइल एसीटेट-मेलिक ॲसिड-विनाइल क्लोराईड कोपोलिमर' सारख्या रासायनिक मटेरियलवरही बंदी असेल. एफएसएसएआयने सल्ला दिला आहे की, आता प्लास्टिक पाऊचऐवजी कागद, पुठ्ठा आणि सेल्युलोजसारख्या नैसर्गिक वस्तूंचा वापर केला जावा. नियामक म्हणतो की, या वस्तू खाण्यापिण्याचे पदार्थ पॅक करण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आहेत. यासोबतच, कंपन्यांसाठीही या नवीन सामग्रीचा स्वीकार करणे आणि वापरणे सोपे होईल. आरोग्य मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्यानुसार, जे उत्पादक पाऊचऐवजी टीन किंवा काचेच्या कंटेनर्सचा वापर करत आहेत, ते तो वापर सुरू ठेवू शकतील. यामुळे उत्पादकांना त्यांच्या व्यावसायिक गरजेनुसार लवचिकता मिळेल, मात्र त्यांनी नियामक चौकटीत राहणे आवश्यक आहे.

# मस्साजोगमध्ये अनपेक्षित निकाल

## देशमुख कुटुंबाला मोठा धक्का

बीड (वृत्तसंस्था)

मस्साजोग ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीची २९ एप्रिल रोजी मतमोजणी पूर्ण झाली असून, धक्कादायक निकाल लागला आहे. या निवडणुकीत दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा पराभव झाला आहे. प्रतिस्पर्धी स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांनी विजय मिळवला आहे.

मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. संतोष देशमुखांच्या निधनानंतर हे सरपंचपद रिक्त झाले होते. या रिक्त जागेसाठी आता पोटनिवडणूक घेण्यात आली. दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख स्वतः मैदानात उतरल्याने या निवडणुकीला एक भावनिक किनार प्राप्त झाली होती. मात्र, या निवडणुकीत अश्विनी देशमुख यांना पराभव स्वीकारावा लागला आहे. मस्साजोग ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीसाठी काल मतदान घेण्यात. त्यानंतर केज तहसील कार्यालया मतमोजणी प्रक्रिया पार पडली. एकूण तीन फेऱ्यांमध्ये मतमोजणी झाली. पहिल्या फेरीपासूनच अश्विनी देशमुख या पिछाडीवर होत्या. पहिल्या फेरीत १५६ मतांनी, तर दुसऱ्या फेरीत २० मतांनी स्वरूपानंद देशमुख हे आघाडीवर होते. स्वरूपानंद देशमुख यांच्या विजयानंतर कार्यकर्त्यांकडून जल्लोष साजरा करण्यात आला आहे.

# विवेक कोल्हेंना भाजपकडून उमेदवारी

## जिल्ह्यात आता ५ जण विधानपरिषदेचे आमदार

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय कार्यालयाकडून विधान परिषदेसाठी पाच उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली असून, यामध्ये अहिल्यानगर कोपरगाव तालुक्यातील युवा नेते विवेक कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या निर्णयामुळे कोपरगावला आता दुसरा आमदार मिळणार आहे. विवेक कोल्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याने कोल्हे समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याशिवाय मूळचे अहिल्या नगर जिल्ह्यातील असलेले आणि



भाजपच्या संघटनेत काम करणारे निष्ठावंत सुनील कर्जतकर यांनाही भाजपने विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे. कर्जतकर हे मूळचे जामखेड तालुक्यातील नान्नज जवळा येथील आहेत. कर्जतकर यांच्या रूपाने कर्जत जामखेड मतदारसंघाला तिसरा आमदार मिळाला आहे.

अहिल्या नगर जिल्ह्यात विधानसभेचे १२ आमदार असून आता विधानपरिषदेतही नगर जिल्ह्यातील ५ आमदार झाले आहेत. कर्जत जामखेड मतदारसंघाचे माजी आमदार प्रा. राम शिंदे यांनाही भाजपने विधानपरिषदेत आमदार करून नंतर सभापतीपदही दिले आहे. नगर जिल्ह्यातील संगमनेर येथील सत्यजित तांबे नाशिक पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर निवडून गेले आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शिवाजीराव गर्जे हे सुद्धा विधानपरिषदेचे आमदार आहेत. ते मूळचे पाथर्डी तालुक्यातील आहेत. गर्जे अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीत संघटनेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

# नाशिकमध्ये ACB ची मोठी कारवाई

## जिल्हा परिषदेचे तीन अधिकारी लाच स्वीकारतांना जाळ्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिकमध्ये - एसीबी पथकाने मोठी कारवाई करत जिल्हा परिषदेच्या तीन अधिकाऱ्यांना लाच स्वीकारतांना रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. मोजमाप पुस्तिकेवर स्वाक्षरी करण्यासाठी कंत्राटदाराकडून ६ हजार रुपयांची लाच घेताना वर्ग १, २ आणि ३ अशा तिन्ही श्रेणीतील अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणात सतीश साहेबराव दराडे (४२, रा. मखमलाबाद), सागर सतीश रावले (३५, रा. मखमलाबाद) व रवींद्र रामनाथ गायकवाड (२९, रा. चांदशी) या तिघांना ताब्यात घेतले आहे. हे तिघेही जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या इगतपुरी उपविभागात कार्यरत असून, इगतपुरी तालुक्यातील पिंपळगाव मोर येथे ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून ठेकेदारीचा परवाना घेतला आहे. त्यांनी पिंपळगाव मोर ग्रामपंचायतीची दोन कामे नोव्हेंबर २०२५ मध्ये मुदतीत पूर्ण केली होती. या कामाचे अंदाजे ४ लाख ५० हजार रुपयांचे बिल काढण्यासाठी 'मोजमाप पुस्तिके'वर स्वाक्षरी होणे आवश्यक होते. यासंदर्भात त्यांनी संशयित स्थापत्य अभियांत्रिकी सहायक असलेले रावले यांची भेट घेत चर्चा केली. मात्र, बिलाच्या २ टक्के म्हणजेच १ हजार रुपये घेतल्याशिवाय संशयित सहायक अभियंता दराडे स्वाक्षरी करणार नाहीत, असे सांगितले अन त्यास दराडे यांनीही दुजोरा दिला.

दरम्यान, तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. यानंतर तक्रारीची शहानिशा करुन सोमवार (दि.२७) रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. तडजोडीनंतर ६ हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर इगतपुरी उपविभागाच्या कार्यालयात संशयितांनी हे पैसे टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यास सांगितले. यावेळी दराडे यांनी पैसे स्वीकारून ते कनिष्ठ सहायक असलेल्या संशयित गायकवाडकडे सोपवताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने तिघांनाही अटक केली.

विशेष म्हणजे एसीबी च्या या कारवाईत एकाच वेळी तीन वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी सहभागी असल्याचे समोर आले आहे. यात लाचेची मागणी रावले याने केली, त्याला दराडे यांनी संमती दिली आणि पैसे गायकवाड याने सांभाळले. या तिघांविरुद्ध इगतपुरी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून, याचा तपास एसीबी करत आहे.

# श्याम मानव यांचे ८० लाखांचे आव्हान धीरेंद्र शास्त्रींनी स्विकारले

मुंबई (वृत्तसंस्था)

पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री नागपूरच्या रेशीम बागेत २६ ते ३० एप्रिलपर्यंत श्री राम कथा करत आहेत. या दरम्यान धीरेंद्र शास्त्री आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव यांच्यात श्रद्धा, अध्यात्म आणि विज्ञानावरून वाद वाढला आहे. श्याम मानव यांनी ८० लाख रुपयांचे आव्हान दिले होते. हे आव्हान धीरेंद्र शास्त्री यांनी स्वीकारले आहे.

श्याम मानव यांनी धीरेंद्र शास्त्रींना १० लोकांची नावे, त्यांच्या वडिलांचे नाव, वय आणि मोबाईल नंबर अचूक सांगण्याचे आव्हान दिले आहे. तसेच,





'अतींद्रिय शक्ती'च्या परीक्षेसाठी बंद खोलीत ठेवलेल्या १० वस्तू ओळखायच्या आहेत.

दोन्ही परीक्षांमध्ये किमान ९० टक्के अचूकता आवश्यक ठेवण्यात आली आहे. ही प्रक्रिया नागपूरमध्ये पत्रकारांच्या उपस्थितीत होईल. समितीकडून सांगण्यात आले की, धीरेंद्र शास्त्री यांना यश मिळाल्यास ८० लाख रुपये दिले जातील अन्यथा याला लोकांच्या भावनांचा गैरफायदा घेणे मानले जाईल.


हा वाद नवीन नाही. जानेवारी २०२३ मध्येही नागपूरमध्ये श्याम मानव यांनी ३० लाख रुपयांचे आव्हान दिले होते. त्यावेळी आरोप होता की, धीरेंद्र शास्त्री दोन दिवसांपूर्वी कथा सोडून निघून गेले होते. मात्र बागेश्वर बाबांनी फेटाळून लावले होते.मंगळवारी कथेदरम्यान बाबांनी आव्हान स्वीकारत म्हटले, यावेळी आम्ही नागपुरातच आहोत. मध्य प्रदेशात नाहीत. एक तासासाठी नाही, तर पाच दिवसांसाठी आहे. कथेचा पंडाल लागलेला आहे. राज्य त्यांचे, शहर त्यांचे आणि मंच देखील त्यांचाच. मी एकटाच आहे. कुणाला काही खाज असेल, तर दरबारात या. आमच्याकडे जी विद्या असेल आणि जी शक्ती असेल, आम्ही तिचे सादरीकरण करू. आम्ही जादूगार नाही. आम्हाला ईश्वर जी प्रेरणा देईल, त्यानुसारच आम्ही लोकांचे मार्गदर्शन करू. ते आले तर त्यांनाही मार्गदर्शन करू.श्याम मानव म्हणाले- सर्व काही बरोबर ठरल्यास आम्ही हार मानू

श्याम मानव म्हणाले की, जर बाबांनी १० लोकांची नावे, वय आणि मोबाईल नंबर बरोबर सांगितले, तर आम्ही हार मानू. वादामुळे नागपूरमधील वातावरण तापले आहे. एका बाजूला भाविक बाबांच्या समर्थनासाठी गर्दी करत आहेत, तर काही संघटना त्यांच्या जुन्या विधानांवरून निदर्शने करत आहेत.

# डॉ. मोहन पुरीच्या औषध निर्मिती कारखान्यावर छापा

युवावार्ता (प्रतिनिधी

संगमनेर - मानसिक समस्यांनी त्रस्त झालेल्या भोळ्या भाबड्या जनतेच्या मानसिक स्थितीचा फायदा घेत त्यांचे आर्थिक शोषण करणाऱ्या दत्तधाम सरकार आश्रमाचा भोंदू राजेंद्र गडगे सध्या पोलीस कोठडीत आहे. तसेच भोंदू राजेंद्र गडगे याच्या साम्राज्याला औषधांची रसद पुरवणारा खरा सूत्रधार डॉ. मोहन पुरी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने संगमनेर तालुका पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानुसार सिन्नर तालुक्यातील जायगाव येथील डॉ. पुरी याच्या 'शिवधाम सरकार' या औषध निर्मिती कारखान्यावरही छापा टाकला आहे. पोलिसांनी बुवाबाजी व आर्थिक फसवणूक झाल्याने विविध कलमान्वये पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. त्यातील मुख्य आरोपी राजेंद्र गडगे व सहआरोपी मधुकर शिंदे यांना अटक केली होती. तर डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे व सूरज शिंदे अद्यापही फरार आहेत. या प्रकरणी अधिक तपास करण्यासाठी पोलिसांनी गडगे व



शिंदे यांची न्यायालयाकडून दोन वेळा पोलीस कोठडी वाढवून घेतली आहे. कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारावर मंत्रोच्चाराने उपचाराचा दावा करणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे याच्या साम्राज्याला औषधांची रसद पुरवणारा खरा सूत्रधार डॉ. मोहन पुरी च असल्याचे पुढे आले. संगमनेर तालुका पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानुसार सिन्नर तालुक्यातील जायगाव येथील डॉ. पुरी याच्या 'शिवधाम सरकार' या औषध निर्मिती कारखान्यावर छापा टाकला असता, दत्तधाम आणि शिवधाममधील औषधांच्या साठ्यात कमालीचे साम्य आढळून आले आहे. या कारवाईत संगमनेर तालुका पोलिसांच्या बरोबर अन्न व औषध प्रशासनाचे मुळे व काकड तसेच नाशिक विभागाचे सहा. आयुक्त देशपांडे उपस्थित होते. या ठिकाणाहून पोलिसांनी ९ प्रकारच्या संशयित औषधांचे नमुने ताब्यात घेतले आहेत. ज्या औषधांच्या बाटल्या आणि गोळ्या दत्तधाममध्ये रुग्णांना दिल्या जात होत्या तशाच स्वरूपाची औषधे शिवधाममध्येही सापडली आहेत. पोलिसांच्या कारवाईवेळी कारखाना सुरु असल्याने केलेल्या चौकशीत व्यवस्थापकाने औषध निर्मितीचा परवाना आणि डॉ. पुरीच्या पदव्या सादर केल्या असल्या, तरी या औषधांचा वापर रुग्णांना फसवण्यासाठी आणि त्यांच्या जिवाशी खेळण्यासाठी केला जात होता हे स्पष्ट होत आहे. या औषधांचे नमुने आता फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, त्यांचा अहवाल आल्यानंतर या भोंदूगिरीतील तांत्रिक आणि वैद्यकीय गुन्हेगारीचे स्वरुप अधिक स्पष्ट होणार आहे.

# भोंदू गणेश शिंदेला 2 मे पर्यंत पोलीस कोठडी

युवावार्ता (प्रतिनिधी)



श्रीरामपूर - गेल्या ३ वर्षांपासून सतत अत्याचार केल्याच्या आणि तंत्र-मंत्र करून आजार बरे करण्याच्या नावाखाली २० लाख रुपये घेतल्याच्या गुन्ह्याखाली बेलापूर येथील गणेश शिंदे या बाबाला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने २ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. जाधव यांच्या न्यायालयासमोर गणेश शिंदे या बाबाला उभे केले होते. सदर बाब संवेदनशील असून, यामध्ये गुंगीच्या औषधांचा वापर केला असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी बाबाला पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी सरकारी पक्षातर्फे करण्यात आली.

सरकारी पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने गणेश शिंदे या बाबास २ मेपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील एस. आर. माडेकर यांनी, तर बाबाच्या वतीने ॲड. जावेद शेख आणि ॲड. आरिफ शेख यांनी बाजू मांडली. बेलापूर येथे गणेश शिंदे या बाबाने दावल मलिक न्यासाची स्थापना करून आपल्याला दावल मलिक बाबा प्रसन्न झाले आहेत, असे सांगून भाविकांना लुबाडण्याचा गोरखधंदा सुरू केला होता. हे करत असताना त्याने हाताखाली काही दलाल नेमले होते. ते दलाल बाबाचा लई गुण येतो, बाबांच्या अंगात दैवी शक्ती आहे, असा प्रचार करायचे. बाबांचा दर गुरुवारी दरबार भरायचा. त्या दरबारात अनेक राजकीय, अराजकीय, नोकरदार आणि सामाजिक कार्यकर्ते यांचा भरणा असायचा. गणेश शिंदे या बाबावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याच्या संपर्कात असणारे सर्वजण काल नॉट रिचेबल होते. या बाबाच्या संपर्कात असणारे अनेकजण पोलीस चौकशीत समोर येणार असून, श्रीरामपूरसह परिसरातील अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

# लाडक्या बहिणींसाठी सरकार घेणार मोठा निर्णय



मुंबई (वृत्तसंस्था)

लाडक्या बहिणींनो लक्ष देऊन ही बातमी वाचा कारण लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारने पुढाकार घेतल्याचं पहायला मिळत आहे. फक्त राज्यातीलच नव्हे संपूर्ण देशातील लाडक्या बहिणींसाठी, महिलांसाठी सरकार मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. महिला आरक्षण विधेयकासाठी महायुती सरकार मैदानात उतरलं आहे. महिला आरक्षणाला पाठिंबा देण्यासाठी राज्य सरकार एक दिवसीय विशेष अधिवेशन घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारने हा पुढाकार घेतल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. महिला आरक्षणासाठी घेण्यात येणारं हे एक दिवसीय विशेष अधिवेशन में महिन्यात पार पडणार आहे. मात्र असं असलं तरी ते नेमकं कधी होणार याच्या तारखे संदर्भात अद्याप स्पष्टता नाही. पण लवकरच ती तारीख जाहीर होईल. या एकदिवसीय अधिवेशनाच्या माध्यमातून सर्वपक्षीय आमदार भूमिका मांडणार असल्याचं समजतं.महिला आरक्षण अधिनियमाशी संबंधित घटना (१३१वे) दुरुस्ती विधेयक २०२६, डिलिमिटेशन विधेयक २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (दुरुस्ती) विधेयक २०२६ यावर गेल्या आठवड्यात संसदेत चर्चा झाली. यानंतर १३१व्या संविधान दुरुस्तीवर चर्चेनंतर विधेयकावर मतदान घेण्यात आलं. मात्र हे विधयक मंजूर झालं नाही. त्यानंतर सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडलं.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नारी शक्ती वंदन अधिनियम दुरुस्ती विधेयक आणि विरोधकांच्या भूमिकेवर सविस्तर भाष्य केलं. आम्ही अजूनही हार मानलेली नाही. भविष्यात महिलांना आरक्षण देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत राहू, असं मोदी यावेळी म्हणाले.

तर लोकसभेत महिला आरक्षण नामंजूर झाल्यानंतर महाराष्ट्रातही महायुती सरकारने या विधेयकाच्या बाजूने भूमिका घेत विरोधकांवर हल्ला चढवला होता. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत अनेक मुद्दे मांडले. विरोधकांनी महिला विरोधातील मानसिकता दाखवली. त्यांनी ७० कोटी महिलांचा विश्वासघात केला अशी टीका फडणवीस यांनी केली होती.

# आ. सत्यजित तांबे यांच्या जनता...

पान १ वरून -


आणि आलेल्या प्रत्येक नागरिकांचे प्रश्न लोकनेते बाळासाहेब थोरात आमदार सत्यजित तांबे सोडवत आहेत. आमदार सत्यजित तांबे यांची विविध भाषांवरील प्रभुत्व, प्रशासनावरील जबर पकड, विविध राजकीय पक्षांमधील सर्वांची स्नेहाचे संबंध, प्रत्येक प्रश्नासाठी पाठपुरावा करण्याची पद्धत,प्रश्न सोडवण्याची हातोटी, विविध विषयांचा अभ्यास यामुळे नागरिकांचे तात्काळ प्रश्न मार्गी लागत आहे. प्रत्येक प्रश्नाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करून रोखठोक पद्धतीने काम करण्याची त्यांची पद्धत सर्वसामान्य नागरिकांना नेहमीच भावली आहे. त्यांनी यशोधन कार्यालयात घेतलेल्या जनता दरबारात लोकांची वैयक्तिक आणि अडचणीचे अनेक कामे मार्गी लावली. याचबरोबर शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न, जलसंपदा विभागातील, महसूल, पोलीस विभागातील अनेक दिवसांचे प्रलंबित कामेही तात्काळ मार्गी लावली. बचत गटांच्या महिलांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला.यावेळी संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात उपस्थित होत्या. तर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे यांच्यासह विविध नगरसेवक व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# सुनेत्रा पवारांना दिलासा, 32 कोटींच्या अघोषित उत्पन्नाची कारवाई रद्द

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना आयटीएटी मध्ये दिलासा मिळाला आहे. सुनेत्रा पवार यांना आयकर अपील न्यायाधिकरणाकडून दिलासा मिळाला आहे. अजित पवार यांच्या विरोधातील आयकर कायद्याच्या कलम १५३सी अंतर्गत सुरू केलेली कार्यवाही रद्द करण्यात आली आहे. अघोषित उत्पन्न म्हणून जोडलेली ३२.१४ कोटी रुपयांची रक्कमही रद्द केली आहे. अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले, त्यानंतर सुनेत्रा पवार यांची भूमिका केवळ प्रक्रियेसाठी रेकॉर्डवर घेण्यात आले होते. अजित पवार आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये काही कथित व्यवहारांचे प्राप्तकर्ते होते, आयटीएटी खंडपीठाला पुरावा अपुरा आढळला आहे.

आयटीने टाकलेल्या छाप्यात जितेन पुजारी यांच्याकडून ट्रायटन ग्रुपच्या डायऱ्या आणि वह्या जप्त करण्यात आल्या होत्या. ज्यात डीडी नावाच्या व्यक्तीच्या नावे ३२ कोटींचे व्यवहार आयकर विभागाला आढळले, आणि त्या आधारे हे 'डीडी' हे अजित पवार असावेत या तर्काच्या आधारे अजित पवार यांच्या उप्पन्नाचे मुल्यांकन करण्याची कारवाई आटी विभागाने केली. मात्र सुनावणी दरम्यान आयटीएटी समोर डीडी



म्हणजे अजित पवार हे सिध्द करण्यास इनकम टॅक्स विभाग अपयशी ठरल्याचे सुनावणी दरम्यान दिसून आले आणि आयटीएटीने अजित पवार यांना क्लिनचीट दिली आहे.

आयटीएटीने असा निष्कर्ष काढला की, आयकर अधिकाऱ्याने सादर केलेल्या पुराव्यांवरून त्याचे समाधान झाले असले तरी, जप्त केलेला माल आणि अजित पवार यांच्यात एक स्पष्ट आणि कायदेशीरदृष्ट्या टिकणारा दुवा प्रस्थापित करण्यात ते अयशस्वी ठरले. त्यानुसार, आयकर अधिकाऱ्याची कारवाई रद्द करण्यात आली.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कायदेशीर वारसदार म्हणून सुनेत्रा पवार यांना 'आयकर अपील न्यायाधिकरणा'कडून मोठा दिलासा मिळाला आहे. आयकर विभागाने अजित पवार यांच्या नावावर जोडलेले ३२.१४ कोटी रुपयांचे अघोषित उत्पन्न आणि त्यावरील कायदेशीर कारवाई न्यायाधिकरणाने रद्द ठरवली आहे.

जुलै २०२० मध्ये आयकर विभागाने 'ट्रायटन ग्रुप'वर टाकलेल्या छाप्यात जितेन पुजारी नावाच्या व्यक्तीकडून काही हस्तलिखित डायऱ्या आणि डिजिटल पुरावे जप्त केले होते. या डायऱ्यांमध्ये डीडी या नावापुढील ३२ कोटी रुपयांच्या व्यवहारांच्या नोंदी आढळल्या होत्या. आयकर अधिकाऱ्यांच्या मते, हे 'डीडी' म्हणजेच 'अजित पवार' होते. या आधारे त्यांच्या २०१९-२० या आर्थिक वर्षातील उत्पन्नात ३२.१४ कोटींची भर टाकून त्यावर ७० टक्क्यांहून अधिक दराने कर आकारण्याची कारवाई सुरू करण्यात आली होती.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# अभिप्राय कक्षामुळे पारदर्शक प्रशासनास नवी दिशा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा राज्यस्तरीय सन्मान

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

सुस्पष्ट दृष्टी, प्रभावी अंमलबजावणी आणि जनसेवेसाठी असलेली कटिबद्धता यांतून साकारलेला ‘अभिप्राय कक्ष’ हा उपक्रम प्रशासनातील पारदर्शकता व उत्तरदायित्व वृद्धिंगत करणारा ठरला आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात मुख्य



सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. जिल्ह्यासाठी ही अत्यंत भूषणावह बाब ठरली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर जिल्ह्यात दि. १ जुलै २०२५ पासून ‘अभिप्राय कक्ष’ उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. नागरिकांना सेवा देताना पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. ‘आपले सरकार’ सेवा केंद्रांतून लाभ घेतलेल्या प्रत्येक नागरिकाशी थेट संपर्क साधून त्यांचा अभिप्राय नोंदविला जातो. प्राप्त अभिप्रायाचा गांभीर्याने विचार करून आवश्यक असलेल्या प्रकरणांवर तत्काळ कार्यवाही केली जाते.

या उपक्रमामुळे प्रशासन अधिक सजग, उत्तरदायी व कार्यक्षम बनत आहे. मार्च २०२६ अखेरपर्यंत १ लाख ५० हजार नागरिकांशी थेट संपर्क साधण्यात आला असून, प्राप्त झालेल्या ४९४ तक्रारींपैकी ३३३ तक्रारींचे यशस्वी निराकरण करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांना सेवा अधिक जलद, पारदर्शक व सुलभ पद्धतीने पुरविल्या जात आहेत.

विश्वास, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांचा संगम असलेला ‘अभिप्राय कक्ष’ हा उपक्रम अहिल्यानगर जिल्ह्यात प्रशासकीय कार्यक्षमतेचा नवा मापदंड ठरत आहे. हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही अनुकरणीय आदर्श ठरू शकतो, हेच या राज्यस्तरीय सन्मानातून अधोरेखित होते.

# पोलीस ठाण्यातून मोटारसायकलची चोरी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या आवारातूनच चोरट्यांनी दुचाकी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. पोलीस ठाण्यासारख्या सुरक्षित ठिकाणाहून मोटारसायकल चोरीला गेल्याने शहरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, फिर्यादी महिला पोलीस उपनिरीक्षक फराहनाज अनिस पटेल (रा. संगमनेर शहर पोलीस स्टेशन, जि. अहिल्यानगर) यांची ३० हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची ’स्प्लेंडर प्लस’ मोटारसायकल (क्रमांक एम एच १७ ए वाय ५६१६) अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या दरम्यान संगमनेर शहर पोलीस स्टेशनच्या आवारात घडली.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून संगमनेर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३०/२०२६ नुसार दाखल करण्यात आला आहे.

# युवा उद्योजक घडवणे गरजेचे - कल्पित वाकचौरे

## रिपब्लिकन उद्योग आघाडीची बैठक उत्साहात

पुणे (युवावार्ता प्रतिनिधी)-

कोथरूड येथील लुणावत प्रिसम येथे रिपब्लिकन उद्योग आघाडी, महाराष्ट्र राज्य कोअर कमिटीची बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीचे आयोजन आघाडीचे सचिव माननीय कल्पित विजय वाकचौरे यांनी केले होते. उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करताना वाकचौरे म्हणाले की, आजपर्यंत आपल्या समाजाच्या तीन ते चार पिढ्या सामाजिक संघर्षात गेल्या आहेत. समाजावर होणाऱ्या अन्याय व अत्याचारांविरुद्ध आपण सातत्याने लढा दिला आहे. या संघर्षात आपल्या आजोबांपासून वडिलांपर्यंत सर्वांनी सहभाग घेतला आणि आजही आपण स्वतः हा लढा पुढे नेत आहोत. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि त्याला ठामपणे विरोध करणे हा आपल्या समाजाचा स्वभावच बनला आहे. मात्र, या सातत्यपुर्ण संघर्षातून वैचारिक प्रगती झाली असली, तरी आर्थिक स्थितीत अपेक्षित बदल झालेला नाही. आजोबांपासून नातवापर्यंत गरिबी कायम राहिल्याचे वास्तव आहे. संघर्षाचा लाभ केवळ काही मोजक्या लोकांपर्यंतच मर्यादित राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

याच पार्श्वभुमीवर संघर्षाच्या मार्गात सकारात्मक बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय समाजकल्याण मंत्री



रामदास आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली समाजातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे. तरुणांनी उद्योग क्षेत्रात प्रवेश करून यशस्वी उद्योजक बनावे, रोजगारनिर्मिती करावी आणि समाजाला आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या बळकट करावे, हा यामागील प्रमुख उद्देश आहे. या उद्देशाने रिपब्लिकन उद्योग आघाडाची स्थापना करण्यात आली असन उद्योग क्षेत्रात येऊ इच्छणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देणे, त्यांची प्रोफाइल तयार करणे, बँकेच्या कर्जासाठी मार्गदर्शन करणे, शासनाच्या विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देणे, उद्योग उभारणीस सहाय्य करणे तसेच उत्पादित मालासाठी देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देणे, या बाबींवर आघाडी कार्य करणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या ’आत्मनिर्भर भारत’ संकल्पनेला चालना देण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब यांनी पुढाकार घेतला असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य कोअर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे. या कोअर कमिटीमध्ये आयात-निर्यात विभागातील माजी अधिकारी, मंत्रालयातील माजी सनदी अधिकारी, माजी आयएएस व आयपीएस अधिकारी, नामांकित बँकांचे अधिकारी, अनुभवी उद्योजक, चार्टर्ड अकाऊंटन्ट, कॉर्पोरेट क्षेत्रातील तज्ञ वकील तसेच नामांकित डॉक्टरांचा समावेश करण्यात आला आहे.

यावेळी आघाडीच्या पुढील वाटचालीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली, महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात रिपब्लिकन उद्योग आघाडीच्या शाखा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच राज्यभर प्रशिक्षण शिबिरे व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी कल्पित वाकचौरे यांनी दिली. ते म्हणाले, उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांनी आघाडीशी संपर्क साधावा, असे आवाहन देखील करण्यात आले. सभेच्या शेवटी उपस्थितांचे आभार संदीप घोलप यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### आपला समाज सक्षम होईल...



**रिपब्लिकन उद्योग आघाडीच्या माध्यमातून चांगले काम सुरु आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, शासनकर्ती जमात व्हा, सक्षम व्हा, स्वत:च्या पायावर उभे रहा. त्यानुसार आपले तरुण व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रात देखील गेले पाहिजे. समाजाचे परिवर्तन घडवायचे असेल, तर आर्थिक उन्नतीशिवाय पर्याय नाही. रिपाईच्या वतीने असा सक्षम तरुण घडविण्याचे काम कल्पित वाकचौरे करीत आहेत. त्यांना शुभेच्छा आहे.**

**– खा. रामदास आठवले (केंद्रीय समाजकल्याण मंत्री)**

# 'शिवाजी कोण होता? पुस्तकाचे अकोलेत सामूहिक अभिवाचन

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

छत्रपती शिवाजी महाराज यांचा लोककल्याणकारी राज्यकारभार, अतुलनीय पराक्रम आणि कार्यकर्तृत्वाचे यथार्थ चित्रण असलेल्या गोविंद पानसरे लिखित ’शिवाजी कोण होता ?’ या पुस्तकाचे अकोले येथील शिवाजी चौकात अभिवाचन करण्यात आले. येथील बळीराजा अभ्यास मंडळ व समविचारी संस्था आणि संघटनांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा उपक्रम पार पडला. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अकोले महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. किरण जाधव यांनी ऐतिहासिक संदर्भासह प्रास्ताविक करत उपक्रमाची दिशा स्पष्ट केली.

अलीकडेच या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांनी दूरध्वनीवरून अवमानकारक भाषा वापरल्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर राज्यभरातून संताप व्यक्त होत असून, ठिकठिकाणी या पुस्तकाचे सामूहिक अभिवाचन केले जात आहे. अकोले येथेही या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी आणि विचारांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अभिवाचन करण्यात आले.

प्रा. चंद्रशेखर हासे, तेजस्विनी माघाडे, विजया पाडेकर, डॉ. संदीप कडलग, प्रा. डॉ. महेजबीन सय्यद, आशिष पडवळ, सुनीता रूपवते, प्रा. मॉडर्न हायस्कूल येथे इयत्ता सहावीमध्ये शिकणारी ध्रुवी वैद्य ही चिमुरडी बहिणीबरोबर आली होती. अभिवाचन सुरू झाल्यानंतर ती स्वत:हून पुढे आली आणि ’मलाही वाचायचे आहे’ असे म्हणत तिने इच्छा व्यक्त केली. उपस्थितांनी टाळ्या वाजवून तिच्या





अभिवाचनास दाद दिली. महेश पाडेकर, स्वरा वैद्य, गणेश ताजणे, अनिकेत वैद्य, प्रतीक वाकचौरे, क्रांती रेवगडे, शिवशाहीर डॉ. मुकुंदा भोर, प्रा. बाळासाहेब मेहेत्रे तसेच अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त गिरजाजी जाधव यांनी अभिवाचनात सहभाग घेतला. अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या अभिवाचनाने सांगता झाली.

शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर यांनी अकोले तालुक्यातील विश्रामगडाशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक संदर्भाचा तपशील सांगून उपस्थितांचे आभार मानले. प्रा. डॉ. संदेश कासार यांनी सूत्रसंचालन केले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. अजित नवले, डॉ. विजय भगत, रवी रूपवते, अच्युत वैद्य, अनिल मोहिते, अनिकेत घुले, गाथा कल्पना विजय, विशाल शिंदे, गणेश पवार आदींनी परिश्रम घेतले. पुस्तकाच्या अभिवाचनाच्या निमित्ताने एकत्र येऊन शिवप्रेमी कार्यकर्ते आणि नागरिकांनी शांततामय पद्धतीने वैचारिक भूमिका मांडत आमदार गायकवाड यांच्या भूमिकेचा निषेध व्यक्त केला.

# कोल्हापुरी चप्पल जागतिक लक्झरी उत्पादन बनणार – मुख्यमंत्री

मुंबई (प्रतिनिधी)-

महाराष्ट्रातील कारागिरांच्या सृजनातून जन्मलेली कोल्हापुरी चप्पल आज जागतिक लक्झरी उत्पादन बनली असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ‘मेड इन इंडिया’ची ताकद महाराष्ट्राने जगासमोर प्रभावीपणे सादर केली आहे. भारतीय पारंपरिक चर्मकला कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी जागतिक ब्रॅण्ड प्राडा आणि लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग) यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारानुसार कारागिरांच्या कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी प्राडा पुढील तीन वर्षांसाठी नॅशनल इन्स्टिटच्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) आणि कर्नाटक इन्स्टिटच्यूट ऑफ लेदर अँड फॅशन टेक्नॉलॉजी (केआयएलटी) येथे प्रशिक्षण कार्यक्रमासाठी संपूर्ण निधी उपलब्ध करून देणार आहे. या माध्यमातून महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कोल्हापुरी चपला बनवणाऱ्या पारंपरिक लेदर कारागिरांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार असून, पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या कारागिरीला आधुनिक डिझाइन आणि तांत्रिक कौशल्यांची जोड देण्यावर या कार्यक्रमात भर देण्यात येणार आहे. पारंपरिक कला जपणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला जागतिक पातळीवर योग्य ओळख देण्यासाठी ही भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले,



प्राडा सोबत हा करार केवळ कारागिरांच्या श्रमाला प्रतिष्ठा देणारा नाही, तर पिढ्यानपिढ्या जोपासलेल्या भारतीय सांस्कृतिक परंपरेचा गौरव आहे. एक जागतिक ब्रॅण्ड महाराष्ट्रातील कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांच्या या कौशल्याला एक ओळख मिळेल आणि कलेचे संपूर्ण श्रेय या कारागिरांना मिळेल.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या भागीदारीची संकल्पना, समन्वय आणि अंमलबजावणी लिडकॉमने प्रभावीपणे केली असल्याचे नमूद केले. विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय कायदे, जागतिक संबंध आणि बौद्धिक संपत्ती हक्कांचा विचार करून अत्यंत सूक्ष्म नियोजनातून हा करार करण्यात आला आहे. कारागिरांच्या पिढीजात हक्कांचे संरक्षण हेच आमचे प्रमुख ध्येय होते. लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, प्राडा सोबत हा करार भारतीय पारंपरिक हस्तकलेसाठी आणि अनेक दशकांपासून या कलेचे संरक्षण करणाऱ्या संस्थेसाठी अभिमानाचा क्षण आहे. प्राडा पुढील तीन वर्षांसाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ३०० कोल्हापुरी कारागिरांना प्रशिक्षण देण्यासाठी पूर्ण निधी उपलब्ध करून देणार आहे. हे प्रशिक्षण नॅशनल इन्स्टिटच्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) आणि कर्नाटक इन्स्टिटच्यूट ऑफ लेदर अँड फॅशन टेक्नॉलॉजी येथे दिले जाईल. त्यापैकी सर्वोत्तम ३० कारागिरांना इटलीतील प्राडा अकादमीमध्ये प्रगत प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये डिझाइन, तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साधने आणि बाजारपेठेतील ट्रेंड्स यांचा समावेश असणार आहे. यामुळे पारंपरिक कौशल्य जपत कारागिरांना आधुनिक बाजारपेठेसाठी सक्षम बनविण्याचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे शतकानुशतके जपल्या गेलेल्या कोल्हापुरी चप्पल परंपरेला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. यामध्ये लिडकॉम या संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका असून, गेल्या पाच दशकांपासून ही संस्था महाराष्ट्रातील चर्मकार आणि लेदर कारागिरांच्या सन्मान, उपजीविका आणि हक्कांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. १ मे १९७४ रोजी सामाजिक न्याय विभागांतर्गत स्थापन झालेल्या लिडकॉमने पारंपरिक लेदर कारागिरीची ओळख जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कोल्हापुरी चप्पलांना २००९ मध्ये भौगोलिक निर्देशांक (जीआय) दर्जा मिळवून देण्यात संस्थेचा मोठा वाटा आहे.

# मुख्यमंत्री सहायता निधीतून शेकडो रुग्णांना मदत; संकेत सानप यांचा सन्मान

मुंबई (प्रतिनिधी)-

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात, जिथे माणूस माणसापासून दुरावत चालला आहे, तिथे काही व्यक्ती आपल्या कर्तृत्व आणि सामाजिक जाणीव यांनी माणुसकीची ज्योत ज्वलंत ठेवत आहेत. संगमनेर तालुक्यातील आदर्श ते गावचे सुपुत्र आणि सध्या मुंबई, ठाणे येथे रहिवासी असलेले श्री संकेत सुमन तुकाराम सानप हे अशाच एका निस्वार्थ सेवेचे नाव बनले आहे. त्यांच्या याच अतुलनीय कार्याची दखल घेत सक्षम पोलीस टाइम्स राज्यस्तरीय सक्षमरत्न २०२६ आरोग्य उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना नाशिक येथे गौरविण्यात आले. हे अशाच एका निस्वार्थ सेवेचे नाव संकेत सुमन तुकाराम सानप हे बनले आहे.

त्यांच्या ह्याच कार्याची दखल घेत सक्षम पोलीस टाईम यांनी संकट काळातील रुग्णांसाठी दावून जाणारा देव. आरोग्य हीच खरी संपत्ती असली, तरी गरिबीमुळे अनेकांना गंभीर आजारावर उपचार करणे अशक्य होते. अशावेळी सरकार योजना आणि रुग्ण यांच्यातील दुवा बनण्याचे कठीण काम संकेत तुकाराम सानप यांनी स्वीकारले आहे. केवळ शब्दांची सेवा न करता, प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आजवर १०० पेक्षा अधिक रुग्णांना आर्थिक



मदत मिळवून दिली आहे.

साधारण हॉस्पिटलच्या खाटावर मृत्यूची झुंज देत असतो आणि कुटुंबाकडे उपचारासाठी पैसे नसतात, तेव्हा संकेत तुकाराम सानप त्यांच्यासाठी आरोग्य दूध म्हणून उभे राहतात. कागदपत्रांची जुळवा जुळव करण्यापासून ते प्रत्यक्ष निधी मंजूर होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा केवळ प्रशासकीय नसून, त्याच्यामागे मार्मिक सामाजिक गोड आणि आदर्श गाव ते ठाणे जिल्हा एक सेवाभावी प्रवास आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील मातीतील शेतकरी कुटुंबातील संस्कार घेऊन, मुंबई ठाण्यासारख्या महानगरात स्थायिक होत, यांनी आपल्या ग्रामीण भागातील मातीशी, मुळाशी आणि सामाजिक बांधिलकीशी नाते जोडलेले पहायला मिळते. त्यांनी नाते तोडले नाहीत, उलट आपल्या संपर्काचा आणि अनुभवाचा वापर त्यांनी समाजातील शेवटच्या घटका साठी केला. गरीब गरजू कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू पासून त्यांना आरोग्य आणि आरोग्याचे नवजीवन देणे हे कोणताही मोठ्या पुरस्कार पेक्षा श्रेष्ठ कार्य आहे.

संकेत यांच्या सारख्या निस्वार्थ भावनेने तात्काळ मदत मिळवून देणारा अवलिया तयार होण काळाची गरज आहे. या कार्याची दखल घेत सिंदखेड राजा आमदार मनोज कायंदे, नाशिक पदवीधर आमदार सत्यजित दादा तांबे, बाळासाहेब थोरात, धनंजय मुंडे, राज्यमंत्री गोविंदराव केंद्रे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार निलेश लंके, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुजय दादा विखे पाटील, आमदार अमोल खताळ व्यक्ती नी पत्र व्यवहार च्या माध्यमातून संकेत सानप यांच्या पाठिवर कौतुकाची थाप दिली आहे.

# संपादकीय...

## सौरऊर्जेवरील नव्या शुल्कांचा एमएसएमई उद्योगांवर परिणाम

महाराष्ट्रासह देशभरात वाढत्या वीजदरांच्या पार्श्वभूमीवर लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांनी गेल्या काही वर्षांत सौरऊर्जेकडे मोठ्या आशेने पाहिले होते. पारंपरिक वीजपुरवठ्यावरील अवलंबित्व कमी करून उत्पादन खर्च आटोक्यात ठेवणे, पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढवणे आणि दीर्घकालीन स्थैर्य साधणे या उद्देशाने हजारो उद्योगांनी आपल्या कारखान्यांच्या छतांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारले. मात्र अलीकडेच लागू करण्यात आलेल्या नव्या शुल्क धोरणामुळे या सर्व गणिताला मोठा धक्का बसण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सौरऊर्जेच्या वापरावर आकारण्यात येणारे अतिरिक्त जाळा शुल्क, वहन शुल्क आणि इतर विविध आकार यामुळे उद्योगांच्या अपेक्षित बचतीत मोठी घट होत आहे. ज्या उद्योगांनी कर्ज काढून किंवा मोठी भांडवली गुंतवणूक करून सौरऊर्जा प्रकल्प उभारले, त्यांच्यासाठी हा बदल आर्थिक दृष्ट्या धोकादायक ठरत आहे, कारण त्यांनी केलेल्या गुंतवणुकीचा परतावा मिळण्याचा कालावधी आता लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः लघु व सूक्ष्म उद्योग हे आधीच कच्चामालाचे वाढते दर, मजुरी खर्च, बाजारातील स्पर्धा आणि मागणीतील चढउतार यांसारख्या अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत सौरऊर्जेमुळे मिळणारी वीजखर्चातील बचत हा त्यांच्यासाठी दिलासा देणारा घटक होता. परंतु नव्या शुल्कामुळे ही बचतच कमी होत असल्याने उद्योगांच्या नफ्यावर थेट परिणाम होणार आहे. अनेक उद्योगांनी दीर्घकालीन नियोजन करताना सौरऊर्जा स्वस्त आणि स्थिर पर्याय म्हणून गृहीत धरले होते, परंतु धोरणातील अचानक बदलामुळे त्यांच्या आर्थिक नियोजनात अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी काही उद्योग पुन्हा पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून राहण्याचा विचार करू लागले आहेत, तर काहीजण नवीन गुंतवणुकीपासून दूर राहण्याची भूमिका घेत आहेत. या नव्या धोरणाचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे पर्यावरणपूरक ऊर्जेकडे होणारा प्रवास मंदावण्याची शक्यता. शासन एकीकडे हरित ऊर्जा वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवते, तर दुसरीकडे अशा शुल्कांमुळे उद्योगांना प्रत्यक्षात अडथळे निर्माण होत आहेत. सौरऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्याऐवजी जर अतिरिक्त आर्थिक भार टाकला गेला, तर उद्योगांचा उत्साह कमी होणे स्वाभाविक आहे. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील उद्योगांसाठी सौरऊर्जा ही केवळ खर्च बचतीची नव्हे, तर वीजपुरवठ्याच्या अनियमिततेवर मात करण्याची साधन होती. आता त्याच साधनावर आर्थिक बंधने आल्याने या भागातील औद्योगिक विकासालाही मर्यादा येऊ शकतात. यामागे वीज वितरण संस्थांची आर्थिक अडचण, जाळ्याचे देखभाल खर्च आणि पारंपरिक वीजपुरवठ्यावरील दबाव यांसारखी कारणे असली, तरी त्याचे ओझे थेट उद्योगांवर टाकणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. धोरणकर्त्यांनी उद्योग, पर्यावरण आणि वीज क्षेत्र यांच्यात समतोल साधण्याची गरज आहे. जर सौरऊर्जा वापरणाऱ्या उद्योगांवरच अतिरिक्त भार टाकला, तर दीर्घकालीन दृष्टीने देशाच्या ऊर्जा स्वावलंबनाच्या उद्दिष्टालाच बाधा येऊ शकते. यासाठी अधिक सुसंगत आणि उद्योगपूरक धोरण आवश्यक आहे, ज्यामध्ये जाळा वापराचे शुल्क वाजवी ठेवून उद्योगांना प्रोत्साहन दिले जाईल. एकूणच, सौरऊर्जेवरील नव्या शुल्कामुळे लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांसमोर नवे आर्थिक आणि धोरणात्मक आव्हान उभे राहिले आहे. या परिस्थितीत शासनाने उद्योगांच्या अडचणी लक्षात घेऊन धोरणात आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे, अन्यथा उत्पादन खर्च वाढणे, स्पर्धात्मकता कमी होणे आणि औद्योगिक वाढीचा वेग मंदावणे हे परिणाम टाळणे कठीण ठरेल. उद्योग हे अर्थव्यवस्थेचे कणा आहेत आणि त्यांना स्थिर, परवडणारी व विश्वासार्ह ऊर्जा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे सौरऊर्जेच्या वापराला चालना देणारे, उद्योगांना दिलासा देणारे आणि पर्यावरणाच्या दृष्टीने हितकारक असे संतुलित धोरण राबवणे हीच काळाची गरज आहे.


युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची


# बर झालं शिर्डीतून हरलो, नाहीतर आज मला ...आठवलेंचा काँग्रेसला चिमटा

सांगली (प्रतिनिधी)-

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी शिर्डीतील पराभवावर विनोदी टोलेबाजी केली. 'बरं झालं मी हरलो, नाहीतर काँग्रेससोबत राहावं लागलं असतं,' असं म्हणत त्यांनी काँग्रेस सोडण्याचे कारण सांगतानाच रिपब्लिकन पक्षाचे नेते आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावर तुफान टोलेबाजी केली. या पराभवामुळेच आपण शिवसेना-भाजपासोबत गेल्याचे ते सांगण्यास विसरले नाहीत. पक्षसदस्यता सांगलीतील कार्यक्रमात खासदार विशाल पाटील यांच्यासोबत झालेल्या त्यांच्या टोलेबाजीने उपस्थितांचे मनोरंजन केले. काँग्रेसने आठवलेंसारख्या नेत्याला ताकद न दिल्याने पक्षाला मोठा फटका बसल्याचेही पाटील म्हणाले. शिर्डीतील पराभवावरून त्यांनी हे विधान केलं आहे.



मी काँग्रेस सोबत होतो. काँग्रेसने मला शिर्डीतून तिकीट दिलं. पण बरं झालं मी शिर्डीतून हरलो. नाहीतर आज मला काँग्रेससोबत राहावं लागलं असतं, असा चिमटा रामदास आठवले यांनी काढला. तसेच, आपल्याला पाडण्यासाठी की जिंकण्यासाठी तिकीट दिलं हे आजवर मला कळलं नाही, अशी मिश्कीलीही त्यांनी केली. त्यामुळे उपस्थितांमध्ये एकच खसखस पिकली. बाळासाहेब विखे पाटलांनी आपल्याला शिर्डीला बोलावलं, पण हरवण्यासाठी किंवा निवडून आणण्यासाठी हे आपल्याला माहीत नव्हतं. मात्र, काही प्रचारामुळे शिर्डीची निवडणूक हरल्यामुळे आपण शिवसेना भाजपासोबत गेलो, असं रामदास आठवले म्हणाले.

यावेळी रामदास आठवले आणि सांगलीचे खासदार विशाल पाटील यांच्यात चांगलीच टोलेबाजी रंगली. विशाल पाटील हे अपक्ष खासदार नाहीत, ते सर्वपक्षीय खासदार आहेत. त्यांना सगळ्या पक्षांनी मदत केली आहे. कोणी वरून केली तर कोणी आतून, असं आठवले म्हणाले. निवडणूकसल्ला आठवलेंच्या या गुगलीवर विशाल पाटलांनीही षटकार लगावला. महिला विधेयका दरम्यान संसदेत रामदास आठवले यांना बोलू दिले नाही. पण ते बोलले असते, तर कदाचित त्यांनी आम्हाला विधेयक समजून सांगितलं असतं. ज्यामुळे आम्ही प्रेरित होऊन चुकीचं बटन दाबू, अशी भीती आमच्या मनात निर्माण झाली होती, असा खोचक टोला खासदार विशाल पाटलांनी रामदास आठवलेंना लगावला.

# धांदरफळ खु. शाळेचे प्रज्ञाशोध परीक्षेत यश

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-



धांदरफळ खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने सावित्रीबाई फुले प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत, पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या परीक्षेत जिल्हास्तरावर इयत्ता पहिलीतील सावी अमोल गुंजाळ व अनुराग निलेश घुले हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तर तालुकास्तरावर इयत्ता पहिलीतील अस्मित मिलिंद खाताळ, सृष्टी संदीप खताळ, इयत्ता दुसरीतील ज्ञानदा किशोर खताळ, तेजश्री राजेंद्र खताळ, इयत्ता तिसरीतील सानवी योगेश खताळ, ईशान अनिकेत खताळ, अथर्व निलेश घुले, इयत्ता चौथीतील राजवर्धन अतुल खाताळ, अवनी गणेश वलवे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

याशिवाय, केंद्रस्तरावर इयत्ता पहिलीतील वेदिका राजेश गुंजाळ व समृद्धी दीपक कोकणे हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामागे मुख्याध्यापिका शाहीन मनियार यांच्या सहकार्यातून शिक्षक राहुल गायकवाड, शिक्षिका निता सावंत आणि ज्योती घोडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## गजल

तुझ्या प्रितीचे मुके खुलासे कळले नाही,
मनात होते तसे कधीही घडले नाही.

हसू देउनी जगास साऱ्या हसवत गेले,
पुढ्यात होते दुःख तरीही रडले नाही.

मुक्त सोडले खुळ्या मनाचे अवखळ घोडे,
लगाम घालू कधी मनाला ठरले नाही.

किती बहरली फुले नव्याने बागेमधली,
मला हवे ते माझ्या हाती उरले नाही.

धडा कळेना कधी कुणाला बघ काळाचा,
नशीब फसवे कधी कुणाला टळले नाही.

तुला मिळाले ऋतू गुलाबी या प्रेमाचे,
वैशाखाचे छळणे माझे सरले नाही.

तरून गेल्या किती विटा त्या काठावरच्या,
इथे लव्हाळे, नदी, किनारे तरले नाही.

सौ. अनुराधा वायकोस

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या. अहिल्यानगर

महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अहिल्यानगर.
कार्यालय फोन नंबर – २३२६१४ Email id : ahmednagarfedration@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/फेडरेशन/५८/सन २०२६ दिनांक : १०/०४/२०२६

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहिरनामा

ज्या अर्थी **जिजाऊ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., चिखली, ता. संगमनेर, जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/ (१०) नुसार मला मा. जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **जे.डी. काळे** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहिर लिलावाने विक्री करित आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिनाणाऱ्यांनी नमुद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ. नं | थकबाकीदारांचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा. रक्कम | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु पै | पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर |
| १ | कर्जदार - ओकार भाऊसाहेब भोकनळ करिता<br>जामि - तुकाराम गणपत हासे यांची मिळकत<br>जामि - ज्ञानदेव गोपीनाथ हासे<br>जामि - अलका भाऊसाहेब भोकनळ | धांदरफळ बु. ता. संगमनेर | २७५०७९८/- + होणारे व्याज+ इतर खर्च | ३५६/१ | १.०८ | ५.५० | मुळ नकाशा प्रमाणे |
| २ | कर्जदार - रामदास दशरथ गोपाळे यांची मिळकत व करिता<br>जामि - रमेश तुकाराम सिनारे यांची मिळकत<br>जामि - संपत राघुजी कवडे<br>जामि - विठ्ठल एकनाथ सिनारे | निमगाव खुर्द<br>चिखली ता. संगमनेर | १७०३७८५/- + होणारे व्याज+ इतर खर्च | २४/७<br>४२/१२ | ०.५३<br>०.१३ | १.८१<br>०.५० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ३ | कर्जदार -रमेश कुंडलिक इंगळे यांची मिळकत<br>जामि - अलका रमेश इंगळे<br>जामि - राहुल रमेश इंगळे | जोर्वे ता. संगमनेर | ५१०४०७/- + होणारे व्याज+ इतर खर्च | २२३ | ०.३२.०० पो.ख ०.०२.०० | १.८० | मुळ नकाशा प्रमाणे |

लिलावाचे ठिकाण व वेळ : https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर **जिजाऊ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., चिखली, ता. संगमनेर, जि.अ.नगर. दि.११/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता.** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पंतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

लिलावाच्या दिवशी दि. ११/०५/२०२६ रोजी लिलवात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं. २ दि.१२/०६/२०२६** रोजी सकाळी ११.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात होईल. तसेच या ही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किमंत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि. १५/०७/२०६ रोजी सकाळी : ११.३० वाजता** https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर **जिजाऊ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., चिखली, , ता. ता.संगमनेर, संगमनेर, जि.अ. जि.अ.नगर** या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

(सही)
जे.डी. काळे
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या, अ.नगर

स्थळ – अ.नगर
दिनांक – १०/०४/२०२६


पाहिजेत

युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १
जाहिरात व्यवस्थापक - १
डिझायनर - १
वितरण व्यवस्थापक - १
टेलिकॉलर - १
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SUNIL RAMNATH GORDE
TO NEW NAME AS
SUNIL RAMBHAU GORDE
BY AFFIDAVIT NO - 438/2026
DATE 27/04/2026
AT - SAYKHINDI, POST - CHIKANI, TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGA , MAHARASHTRA

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला
१२ X १२ फूट गाळा
भाड्याने देणे आहे
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

ड्रायव्हर पाहिजे
कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे
आकर्षक पगार
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
शिक्षण – बारावी व त्यापुढील
8999862759

पाहिजेत
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल ॲण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर
9657230023

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६









दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# पर्यटक व्हिसावर येऊन धर्मप्रसार

## तीन अमेरिकन नागरिकांना 'लीव्ह इंडिया' आदेश

पुणे
(प्रतिनिधी)-
पर्यटक व्हिसावर भारतात येऊन कायद्याचे उल्लंघन करत ख्रिश्चन धर्माचा प्रचार करणाऱ्या तीन अमेरिकन नागरिकांना पुणे पोलिसांनी दणका दिला आहे. ख्रिश्चन धर्म इतर धर्मांपेक्षा श्रेष्ठ आहे, असे सांगत पत्रके वाटणाऱ्या या तिघांनाही येत्या १० मे २०२६ पर्यंत भारत सोडून जाण्याचे अधिकृत आदेश देण्यात आले आहेत. इमिग्रेशन आणि फॉरेनर्स क्टनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ५३, ६५ आणि ६६ वर्षे वयोगटातील हे तीन अमेरिकन नागरिक १९ ते २१ एप्रिल दरम्यान पर्यटक व्हिसावर भारतात आले होते. २६ एप्रिलपासून ते पिंपरी-चिंचवडमधील एका हॉटेलमध्ये मुक्कासाला होते. २७ एप्रिल रोजी सकाळी हे तिघे पुण्याच्या शुक्रवार पेठ भागात फिरत असताना, त्यांनी एका खाजगी कॅब ड्रायव्हरला थांबवून त्याच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी त्याला बायबल आणि ख्रिश्चन धर्माशी संबंधित इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेतील पत्रके देऊन धर्मप्रसार करण्याचा प्रयत्न केला.

कॅब चालकाच्या सतर्कतेमुळे बिंग फुटले.

संबंधित कॅब चालकाने या प्रकाराची माहिती परिसरात रॅलीच्या बंदोबस्तावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना दिली. पोलिसांनी तातडीने या तिघांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात धार्मिक पत्रके आढळून आली. पुणे शहर पोलिसांच्या परदेशी नोंदणी कार्यालयाने (एफआरओ) केलेल्या चौकशीत हे तिघेही पर्यटक व्हिसावर आले असताना धार्मिक प्रचार करत असल्याचे निष्पन्न झाले, जे भारतीय कायद्यानुसार बेकायदेशीर आहे. यासंबंधीचे वृत्त एका इंग्रजी वृत्तसंस्थेने दिले आहे.

पोलिसांनी तिघांना 'लीव्ह इंडिया नोटीस' बजावली.

परदेशी नोंदणी कार्यालयाचे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे यांनी सांगितले की, व्हिसा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल या तिघांना 'लीव्ह इंडिया नोटीस' देण्यात आली आहे. त्यांना १० मे २०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी देश सोडून जाण्याचे आदेश दिले आहेत. तपासात असेही समोर आले की, यापूर्वीही हे नागरिक कधी टुरिस्ट तर कधी बिझनेस व्हिसावर भारतात आले होते, मात्र त्यांचा मुख्य उद्देश धर्मप्रसार हाच असल्याचे दिसून आले आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, नागरिकांच्या सन्मानाचा भक्कम पाया - अपर जिल्हाधिकारी

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-
महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा नागरिकांच्या सन्मानाचा व त्यांच्या हक्कांचा भक्कम पाया असून, या कायद्यामुळे शासनाच्या सेवा नागरिकांना हक्काने मिळण्याची हमी मिळाली आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी हिंगे म्हणाले, विविध विभागांच्या शेकडो सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून, त्या निश्चित कालावधीत देणे बंधनकारक करण्यात आले आहे. 'आपले सरकार' पोर्टलमुळे अनेक सेवा घरबसल्या उपलब्ध झाल्या असून, शासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी झाले आहे. जिल्ह्यात या सेवांच्या अंमलबजावणीत महसूल विभाग आघाडीवर असून, सेवा अत्यंत जलदगतीने दिल्या जात आहेत. ते पुढे म्हणाले, कायद्याच्या मूळ उद्देशानुसार जिल्ह्यातील विविध विभागांनी प्रभावी अंमलबजावणी केली आहे. आगामी काळात या सेवांचा अधिक विस्तार होणार असून, नागरिकांना अधिक जलद आणि कार्यक्षम सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल. अधिसूचित सेवांबरोबरच इतर सेवांमध्येही अनेक अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे, असे त्यांनी सांगितले.

निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते म्हणाले, सेवा ही केवळ जबाबदारी नसून, ती आपली बांधिलकी आहे. प्रत्येक अर्जामागे नागरिकांचा विश्वास आणि अपेक्षा दडलेल्या असतात. त्यामुळे नागरिकांना केंद्रबिंदू मानून त्यांना वेळेत आणि गुणवत्तापूर्ण सेवा देणे आवश्यक आहे. नागरिकांनीही या कायद्याचा प्रभावी वापर करून आपल्या हक्कांची जाणीव ठेवावी आणि आवश्यकतेनुसार अपील प्रक्रियेचा उपयोग करून न्याय मिळवावा. ते पुढे म्हणाले, या कायद्याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे उत्तरदायित्व असून, सेवा देण्यात झालेल्या विलंबाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर दंडाची तरतूद आहे. त्यामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि पारदर्शक झाले आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग 'आपली सेवा, आमचे कर्तव्य' या ब्रीदवाक्याद्वारे नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, अरुण उंडे, माणिक आहेर तसेच तहसीलदार उद्धव नाईक, अमोल मोरे, आकाश दहाडदे, धीरज मांजरे आणि रवी सतवन यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले. तसेच रोहित शिंदे, संतोष खैरनार व रविंद्र मांगुळकर यांचाही उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली, तर सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागूल यांनी केले.

# पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्याचे मतदान पार, १४२ जागांवर मतदारांचा कौल

कोलकाता
(वार्ताहर)-
पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीतील अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक मानल्या गेलेल्या दुसऱ्या टप्प्यासाठी बुधवारी, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी मतदान पार पडले. या टप्प्यात राज्यातील एकूण २९४ जागांपैकी १४२ जागांसाठी मतदान झाले असून, दक्षिण बंगालमधील बालेकिल्ल्यात आपले वर्चस्व टिकवण्यासाठी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि सत्ता खेचून आणण्यासाठी भारतीय जनता पक्ष (भाजप) यांच्यात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. या टप्प्यातील सर्वात लक्षवेधी लढत भवानीपूर मतदारसंघात होत असून, राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात भाजपचे दिग्गज नेते आणि विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी हे निवडणुकीच्या मैदानात आहेत. 'दीदी' आपल्या बालेकिल्ल्यात विजय मिळवतील की सुवेंदू अधिकारी मैदान मारतील, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. दुसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने कोलकाता आणि आसपासच्या आठ जिल्ह्यांमधील १४२ मतदारसंघांचा समावेश होता. या मतदानातून तृणमूल काँग्रेस दक्षिण बंगालमधील आपला बालेकिल्ला कायम ठेवते की भाजप आघाडी घेऊन सत्ता काबीज करते, हे स्पष्ट होणार आहे.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, या १४२ जागांसाठी एकूण ३,२१,७३,८३७ नोंदणीकृत मतदार होते. यामध्ये १,६४,३५,६२७ पुरुष, १,५७,३७,४१८ महिला आणि ७९२ तृतीयपंथी मतदारांचा समावेश होता. सर्व मतदारांना छायाचित्र ओळखपत्रे (ईपीआयसी) जारी करण्यात आली होती. मतदारांपैकी ३,२४३ जण १०० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे होते, तर ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या १,९६,८०१ होती. याशिवाय, १४६ अनिवासी भारतीय (एनआरआय) मतदार आणि ३९,९६१ सेवा मतदारांनीही मतदानाचा हक्क बजावला.

दुसऱ्या टप्प्यात एकूण १,४४८ उमेदवार निवडणूक लढवत होते, ज्यात १,२२८ पुरुष आणि २२० महिलांचा समावेश होता. कोणत्याही जागेवर तृतीयपंथी उमेदवार नव्हता. १४२ जागांपैकी १०७ जागा सर्वसाधारण प्रवर्गात, ३४ जागा अनुसूचित जाती (एससी) आणि एक जागा अनुसूचित जमाती (एसटी) यांच्यासाठी राखीव होती. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील भांगर मतदारसंघात सर्वाधिक १५ उमेदवार रिंगणात होते, तर हुगळी जिल्ह्यातील एका जागेवर सर्वात कमी पाच उमेदवार होते.

कोलकाता व्यतिरिक्त नादिया, पूर्व बर्धमान, हुगळी, दक्षिण २४ परगणा, उत्तर २४ परगणा आणि हावडा या जिल्ह्यांमध्ये मतदान पार पडले. ३९,३०१ प्राथमिक आणि १,७०० सहायक मतदान केंद्रांसह एकूण ४१,००१ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची व्यवस्था करण्यात आली होती.

# वाढत्या उष्णतेपासून नागरिकांनी सावधानता बाळगावी - डॉ. जयश्री थोरात

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
राज्यात सध्या सर्वत्र उष्णतेचा तडाखा वाढला आहे. येत्या आठ दिवसांमध्ये विविध हवामान तज्ज्ञांनी उष्णता वाढीचा धोका सांगितला असून, दुपारच्या वेळी उन्हात जाणे टाळा. याचबरोबर वाढत्या उष्णतेमुळे जास्त पाणी पिण्याबरोबर नागरिकांनी स्वतःचे आरोग्य जपा, असे आवाहन संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा कॅन्सरतज्ज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले आहे.

वाढत्या उष्णतेबाबत नागरिकांना अधिक सतर्क करताना कॅन्सरतज्ज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे की, या वर्षीचा उन्हाळा हा अत्यंत कडक आहे. मागील दोन दिवसात अहिल्यानगर जिल्ह्याचे तापमान ४१.६ अंश सेल्सिअस इतके राहिले आहे. विदर्भात आणि उत्तर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उष्णतेची लाट येत आहे. येणाऱ्या काळामध्ये आपल्याकडे ही उष्णता वाढू शकते. म्हणून नागरिकांनी दुपारच्या वेळेस घराबाहेर पडणे टाळले पाहिजे.



सध्या लग्नकार्य असल्याने अनेक जण घराबाहेर पडत आहे. याच वेळी डोक्यावर टोपी न घेता अनेक युवक तसेच बाहेर पडतात, आणि त्यामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. अति आत्मविश्वास हा आरोग्यासाठी नेहमीच धोकादायक असतो.

उन्हाळ्याच्या या काळामध्ये सर्वांनी भरपूर पाणी प्यावे. उच्च प्रथिने युक्त अन्न टाळा, तसेच शिळे अन्न खाऊ नका. लिंबू पाणी, ताक, नारळ पाणी यासारखी घरगुती पेयांचा जास्तीत जास्त वापर करा. हलके व सौम्य रंगाचे कपडे घाला. चहा, कॉफी, थंड पेय घेणे टाळा. या उपायोजनांबरोबर एखाद्याला जास्त त्रास वाटू लागल्यास, तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधा, असे आवाहन करताना नागरिकांनी स्वतःची काळजी स्वतः घेतली पाहिजे. धावपळ हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मात्र, त्यातही स्वतःच्या आरोग्यासाठी प्रत्येकाने वेळ दिलाच पाहिजे.उष्णतेमुळे वयोवृद्ध नागरिकांनाही त्रास होऊ शकतो, म्हणून अशा नागरिकांनीही शक्यतो उन्हात जाणे टाळावे, जास्तीत जास्त पाणी प्यावे, असे आवाहन त्यांनी केले असून, स्वस्त रहा, मस्त रहा, जबरदस्त रहा, असा आरोग्यदायी सल्ला सर्वांना दिला आहे.

# ठेकेदारावर कारवाईची आ. खताळ यांच्याकडे शेतकऱ्यांची मागणी

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील शेतकऱ्यांनी प्रवरा नदीवरून शेतीसाठी पाणी आणण्याच्या उद्देशाने मोठ्या आर्थिक संकटावर मात करत, तब्बल ९ ते १० किलोमीटर लांबीची पाईपलाईन उभारली होती. या योजनेसाठी शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेतले, तर काहींनी दागदागिने गहाण ठेवून कोट्यवधी रुपयांचा खर्च केला होता. मात्र, आता महावितरणच्या कामासाठी केबल टाकणाऱ्या ठेकेदारामुळे ही पाईपलाईन फुटल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी आ. अमोल खताळ यांच्याकडे करत, संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



पुणे-नाशिक बायपास महामार्गालगत असणाऱ्या खांडगाव रोडखाली इलेक्ट्रॉनिक केबल टाकण्याचे काम महावितरणच्या ठेकेदारामार्फत सुरू होते. यावेळी भुयारी मार्ग (होलपास) घेत असताना ठेकेदाराकडून १० केजी, ६ इंची अशा तब्बल ५ पाईपलाईन्स फोडण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांनी संबंधित ठेकेदाराशी जवळपास दोन महिने वारंवार संपर्क साधून नुकसान भरून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर महावितरण ठेकेदाराकडून देण्यात आलेले पाईप निकृष्ट दर्जाचे दिले असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चातून लाखो रुपये खर्च करून पाईपलाईन दुरुस्त केली. मात्र, विद्युत मोटार सुरू केल्यानंतर पाईपलाईनमधील पाईप अनेक ठिकाणी चिरण्यास व फुटण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे पाईप देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप संतप्त शेतकऱ्यांनी केला आहे.

पाईपलाईन वारंवार फुटत असल्यामुळे पाण्याअभावी कांदा, गहू, हरभरा तसेच जनावरांच्या चाऱ्याची पिके जळून जात असल्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे चंदनापुरी परिसरातील २० ते २५ शेतकऱ्यांनी आ. अमोल खताळ यांची भेट घेत, संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, नुकसानभरपाई मिळावी तसेच आयएसआय (आयएसआय) मार्क असलेले दर्जेदार जीआय पाईप देऊन योग्य पद्धतीने जोडणी करून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# सोनाली मेंगाळ मृत्यू प्रकरणात अखेर आरोपी गजाआड

## १४ महिन्यांनंतर मिळाला न्याय

अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अकोले तालुक्यातील ढोकरी अंबिका नगर येथील सोनाली रावसाहेब मेंगाळ हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने अवघ्या तालुक्यात खळबळ उडवून दिली होती. तब्बल १४ महिने उलटल्यानंतर, न्यायव्यवस्थेच्या निर्णयामुळे आणि अकोले पोलिसांच्या तत्परतेमुळे या प्रकरणात एक मोठा 'ब्रेकथ्रू' मिळाला आहे. न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळताच, अकोले पोलिसांनी सापळा रचून आरोपींना जेरबंद केले आहे. या कारवाईमुळे पीडित कुटुंबीयांना न्याय मिळण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल पडले आहे.

मृत्यूच्या या गुंतागुंतीच्या प्रकरणात आरोपींनी अटक टाळण्यासाठी जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या सुनावणीवेळी आरोपींच्यावतीने ॲड. के. डी. धुमाळ आणि जे. एच. वामन यांनी बाजू मांडली. तर दुसरीकडे, पीडित मुलीचे वडील रावसाहेब मेंगाळ यांनी आपली बाजू मांडण्यासाठी खासगी वकिलांची नियुक्ती केली होती. न्यायालयासमोर सरकारी वकील वाघचौरे आणि विजय उगले यांनी अत्यंत प्रभावी आणि मौलिक युक्तिवाद करत आरोपींविरुद्ध पुरावे सादर केले. हा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला, जो या प्रकरणातील महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरला.



जामीन फेटाळताच, अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप हजारे यांनी तात्काळ सूत्रे हलवली. त्यांनी आपल्या विशेष पथकासह आरोपींचा शोध घेण्यासाठी एक भक्कम सापळा रचला. पोलिसांच्या या चपळाईमुळे आरोपींना पळून जाण्यास वाव मिळाला नाही आणि पोलिसांनी त्यांना यशस्वीरीत्या ताब्यात घेतले. अटकेनंतर आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. आता या कोठडीत आरोपींकडून नेमकी काय माहिती समोर येते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. या कारवाईमुळे सोनाली मेंगाळ मृत्यू प्रकरणात आता तपासाला वेग आला असून, लवकरच यातील सर्व सत्य समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संस्काराची टिमकी...

अशाच गप्पा सुरू होत्या. आमच्या ग्रुपमधील काही तरुण बहुजन प्राध्यापकांनी प्रश्न केला, सध्या समाजाचे थोतांडाचे वातावरण सुरू आहे, यापासून आपल्या मुलांचा बचाव कसा करता येईल? वासरात लंगडी गाय शहाणी म्हणून याचे उत्तर देण्याची जबाबदारी माझ्यावर आली.

मी त्यांना सांगितले - कोणतेही मूल आपल्या आई-वडिलांचे अनुकरण करत असते. आई-वडील सांगत असलेले विचार आणि कृती नकळतपणे या मुलांना प्रमाण असते. आपण जर थोतांडावर विश्वास ठेवत असू, त्याचा विचार करत असू आणि त्या पद्धतीने आचार करत असू, तर मुले आपोआप त्याचे अनुकरण करू लागतात. देव, धर्म, जात, कर्मकांड - हे सर्व आपण त्यांच्या मेंदूत फीड करत असतो. जन्म घेताना त्याची बुद्धी एक कोरी पाटी असते. पालक म्हणून आपण जे त्यावर फीड करतो किंवा रंगवतो, त्यानुसार ते मूल विचार करू लागते आणि कृती करू लागते.

आपल्याला सर्व थोतांडांपासून मुलांना वाचवायचे असेल, तर या संदर्भात आपण स्वतः कोणतेही आचरण करू नये व त्या संदर्भात मुलांना सांगूही नये. त्यामुळे मुलांना थोतांडाचे बाळकडूच मिळणार नाही. मुलांसमोर थोतांडांसंदर्भात आपण टीकाही करण्याचे काम नाही - टीकादेखील मुलांची जिज्ञासा यासंदर्भात वाढवू शकते. या गोष्टी अस्तित्वातच नाहीत, अशा पद्धतीने आपले वर्तन राहिले तर मुलांना थोतांडापासून दूर नेण्याचा प्रश्नच येत नाही, कारण हा प्रकार त्यांना माहीतच झालेला नसतो. आता हे असे विचार मांडल्यावर एखादा संस्काराचा विंचू चावलेला माझ्यावर आग पाखडही करू शकतो - मग मुलांवर संस्कार कसे होणार आणि संस्कार झाले नाहीत, तर ते चांगले व्यक्ती कसे होणार? असे प्रश्न उपस्थित करणे आपल्या देशात 'मी खूप संस्कारित आहे' याचे प्रदर्शन करण्याची सोय आहे.

मला संस्कार हा भाग कायम अमानवी व विनोदी वाटत आलेला आहे. आपल्या देशात स्वतःचे म्हातारपण सुखात जावे, यासाठी प्रत्येक पालक संस्काराच्या मृगजळामागे धावताना दिसतो. आपल्या मुलांनी आपल्याला फुलात ठेवावे, आपल्या ज्ञेत राहावे व आपली सेवा करावी, यासाठी ते संस्कारी बनले पाहिजेत, अशी प्रत्येकाची इच्छा असते. आता




आपण आपल्या आई-बापांना फुलात ठेवले, त्यांची सेवा केली व त्यांचे म्हातारपण सुखात जाईल असे वर्तन केले, तर मुले आपोआप त्या पद्धतीने मोठे झाल्यावर वर्तन करतील. आपण काहीही करायचे नाही, संस्कार देणाऱ्या दुकानांमध्ये मुलांना पाठवायचे आणि तिथून त्यांचा रोबोट कसा बनेल याची सोय पहायची; त्यासाठी एकमेकांशीही संस्काराबद्दल गांभीर्याने चर्चा करायची, एकदम संस्कारी माहोल बनवण्याचा प्रयत्न करायचा!

पुन्हा एकदा - आपले विचार व कृती जशी असेल तसेच मुले त्याचे अनुकरण करतील. याचा फायदा घेत अनेकांनी भारतात संस्काराची दुकाने उघडली आहेत. बुरसटलेले व प्रतिगामी विचार मुलांच्या मेंदूमध्ये या ठिकाणी घुसवले जातात. त्यांना स्वतःच्या कर्तबगारीवर विश्वास निर्माण करण्याऐवजी दैववादी बनवले जाते, तसेच एक उत्तम गुलाम बनवण्याचा प्रयत्न केला जातो. तुमच्या कुटुंबाची, समाजाची व देशाची प्रगती व्हायची असेल, तर बुद्धीने व विचाराने गुलाम असलेली प्रजा कधीही प्रगती करू शकत नाही. आधीच्या पिढीच्या विचारांवर व कृतीवर प्रश्न विचारणारी नवीन पिढीच प्रगती करू शकते. त्यामुळे मुले आज्ञाधारक बनवण्यात जीवनाचे सार्थक नाही, तर मुले जिज्ञासू, नवीन विचार करणारी व नव्या जगाप्रमाणे आचार करणारी निर्माण झाली पाहिजेत. तरच ते वर्तमान जगाशी स्पर्धा करू शकतील आणि त्यामध्ये यशस्वी होऊ शकतील.

मुलांच्या भोवती संस्काराची टिमकी वाजवण्यापेक्षा त्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रत्येक प्रश्नाला विवेकवादी उत्तर द्या. स्वतःच्या कर्तबगारीवर विश्वास निर्माण होईल असे विचार द्या. त्यांना रोबोट किंवा गुलाम बनवू नका. त्यांना एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व लाभलेले आहे - ते फुलण्यासाठी, ते बहरण्यासाठी आवश्यक ते पोषक वातावरण निर्माण करा. कारण, डोक्यातील जुने जळमट फेकल्याशिवाय नव्या जगाची पहाट दिसू शकत नाही.

**- प्रा. डॉ. राहुल हांडे, संगमनेर**
**मो. ८२०८१५५०८६**

आपल्या व्यावसयाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

CorelDRAW Ps Ai Id
पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# आशाताईंच्या स्मृतींना सुरेल अभिवादन

## संगमनेरात 'एक शाम आशाताई के नाम' कार्यक्रम




युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - स्वर सम्राज्ञी पद्मभूषण आशा भोसले यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांना अभिवादन म्हणून सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने शनिवार दिनांक २ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत महाविद्यालयात एक शाम आशाताई के नाम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संचालक प्रा. विनोद राऊत यांनी दिली आहे.

स्वर सम्राज्ञी आशा भोसले यांनी विविध भाषांमधून सुमारे १२००० गीते गायले आहेत. मराठीमधील लोकगीते, कोळीगीते ,याचबरोबर त्यांचे भजन आणि अभंगही अत्यंत प्रसिद्ध आहेत. मागील आठ दशके त्यांनी भारतीय रसिकांच्या मनावर राज्य केले असून आपल्या गायनातून जनतेची सेवा केली आहे.

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात आणि पद्मश्री आशाताई भोसले यांचे स्नेहाचे संबंध राहिले त्यामुळे आशाताई ह्या संगमनेरला २०१४ मध्ये कार्यक्रमासाठी आल्या होत्या याचवेळी सुधीर गाडगीळ यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली होती. यानंतर ही संगमनेरच्या प्रत्येक कार्यक्रमात आशाताई भोसले यांनी आवर्जून लोकनेते बाळासाहेब थोरात यांना फोन करून संगमनेर मधील नागरिकांशी संवाद साधला होता.

त्यांच्या निधनाने देशाच्या संगीत क्षेत्राचे मोठे नुकसान झाले असून आशाताईंना अभिवादन म्हणून सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने एक शाम आशाताई के नाम हा कार्यक्रम शनिवार दिनांक २ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेस महाविद्यालयात होणार आहे. यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात ,माजी आ. डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, पद्मश्री रघुवीर खेडकर, डॉ जयश्रीताई थोरात, सौ दुर्गाताई तांबे, डॉ मैथिलीताई तांबे यांच्यासह संगमनेर मधील विविध मान्यवर व संगीत प्रेमी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी मोफत व खुला असून संगमनेर मधील सर्व संगीत प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयहिंद लोक चळवळ, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालय, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ व प्रा विनोद राऊत यांनी केले आहे.

# तान्हाजी करंजेकर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील डॉ. विकास करंजेकर यांचे वडील तान्हाजी तुकाराम करंजेकर यांचे बुधवार दि.२९-०४-२०२६ रोजी पहाटे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. तान्हाजीराव करंजेकर यांनी भारतमातेच्या रक्षणासाठी सैन्य सेवेत मोलाचे योगदान दिले. ते रिटायर्ड एअर फोर्स अधिकारी व भारतीय स्टेट बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी होते. त्यांच्या पश्चात शिलाताई तान्हाजी करंजेकर ( पत्नी ), डॉ. सौ. सुषमा सुधाकर हांडे (मुलगी), डॉ. विकास तान्हाजी करंजेकर ( मुलगा), सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. तान्हाजीराव करंजेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# नारायण कोळपकर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर कासार समाजाचे जुन्या पिढीतील मार्गदर्शक संजय शेठ, राजेंद्र शेठ, शशांक शेठ कोळपकर यांचे वडील नारायणराव शंकरराव कोळपकर यांचे वयाच्या ९३ यांचे मंगळवारी रात्री निधन झाले. त्यांच्यावर बुधवार दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. नारायण कोळपकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# वाढत्या उष्म्याचा फटका !

## जनगणना प्रशिक्षणाची वेळ बदलण्यासाठी शिक्षक संघटनेचे तहसीलदारांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)-

संगमनेर - सध्या राज्यासह संगमनेर तालुक्यातही उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. या वाढत्या तापमानाचा फटका आता जनगणना प्रशिक्षणालाही बसत आहे. दुपारच्या वेळेस प्रचंड ऊन लागत असल्याने शिक्षकांना प्रशिक्षण घेताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक संघटना संगमनेरच्यावतीने तहसीलदार धीरज मांजरे यांना निवेदन देऊन जनगणना प्रशिक्षणाची वेळ सकाळची करण्याची विनंती केली.

या संदर्भात शिक्षक संघाच्या प्रतिनिधींनी तहसीलदार साहेबांशी चर्चा केली आणि वाढत्या उष्म्यामुळे शिक्षकांना होणारा त्रास त्यांच्या निदर्शनास आणून दिला. अनेक शिक्षकांना दुपारच्या वेळेस लांबून प्रवास करून प्रशिक्षणासाठी यावे लागते, ज्यामुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. तसेच, दुपारच्या वेळेस प्रचंड उकाडा असल्याने लक्ष केंद्रित करणे कठीण जाते आणि प्रशिक्षणाचा परिणामही कमी होतो. त्यामुळे प्रशिक्षणाची वेळ सकाळची ७ ते १२ अशी केल्यास शिक्षकांना दिलासा मिळेल आणि प्रशिक्षण अधिक प्रभावी होईल अशी विनंती शिक्षकांनी केली.

शिक्षक नेते आर. पी. राहणे आणि अध्यक्ष सोमनाथ घुले, संदीप पोखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात वाढत्या उष्म्याचा मुद्दा तर मांडलाच आहे. सोबतच जनगणना कामासाठी आवश्यक असलेल्या अँड्रॉइड मोबाईल व्हर्जन १२ च्या उपकरणांची उपलब्धता आणि काही ठिकाणी शिक्षकांना १००% आदेश असल्याने माध्यमिक शिक्षक व इतर विभागातील कर्मचारी घेण्याबाबतही विनंती केली आहे. तसेच महिला शिक्षकांना या कामातून वगळण्याची मागणी करण्यात आली आहे.

तहसीलदार साहेबांनी शिक्षकांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यांना योग्य ती दखल घेण्याचे आश्वासन दिले. सदरचे निवेदन तात्काळ जिल्हाधिकारी साहेबांना पाठवणार असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# तळपत्या उन्हात रस्त्याचे डांबरीकरण...

पान १ वरून - डांबरीकरणाचे काम सुरू असल्याने वाहनधारकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. विशेषतः शाळा, कार्यालये आणि बाजारपेठेच्या वेळेत नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. भर उन्हात दुचाकी चालकांना रस्त्यावर उभे रहावे लागते. अनेकदा आपत्कालीन सेवा देखील या कोंडीत अडकण्याचा धोका निर्माण होत असल्याने ही बाब गंभीर मानली जात आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिक, व्यापारी आणि विविध सामाजिक संघटनांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे (झथऊ) आणि नगरपालिकेकडे मागणी करण्यात येत आहे की, रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे रात्रीच्या वेळेत करण्यात यावीत. रात्रीच्या वेळेत वाहतूक तुलनेने कमी असते, तसेच तापमानही नियंत्रित असते. त्यामुळे काम अधिक सुरळीत आणि जलद गतीने पूर्ण होऊ शकते, असा नागरिकांचा विश्वास आहे. काही ठिकाणी रात्रीच्या वेळेत कामे केल्यास दर्जाही चांगला राहतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. कारण कमी तापमानात डांबर योग्य पद्धतीने बसते आणि रस्त्यांचा टिकाऊपणा वाढतो. त्यामुळे दीर्घकालीन दृष्टीनेही हा निर्णय फायदेशीर ठरू शकतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने या मागणीची दखल घेऊन कामांच्या वेळापत्रकात बदल करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आणि कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्यास विकासकामांना अधिक गती मिळेल आणि सर्वसामान्यांचा त्रासही कमी होईल, अशी भावना व्यक्त होत आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, रडी इको, एक्सरे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्मनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25